# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः17.09.2025** **वारःबुधवार**

---

1. पंतप्रधानांच्या हस्ते आज मध्यप्रदेशात धार इथं "स्वस्थ नारी सशक्त परिवार" अभियानाचा प्रारंभ
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 75व्या वाढदिवसानिमित्त देशभरात सेवा पंधरवड्याचं आयोजन
3. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ब्रिटन दौऱ्यावर-दोन्ही देशांमध्ये करार अपेक्षित
4. हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त मराठवाड्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन आणि
5. भारत ऑस्ट्रेलिया महिला क्रिकेट संघामध्ये मर्यादित षटकांचा दुसरा सामना आज चंदीगडमध्ये

**पंतप्रधान-स्वस्थ नारी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मध्य प्रदेशच्या दौऱ्यावर जाणार आहेत. त्यांच्या हस्ते दुपारी धार इथं "स्वस्थ नारी सशक्त परिवार" आणि "8 व्या राष्ट्रीय पोषण माह" अभियानाला प्रारंभ होणार आहेत. ही मोहीम आजपासून दोन ऑक्टोबर पर्यंत सुरू राहील. या कालावधीत देशभरातली आयुष्मान आरोग्य मंदिरं, सामुदायिक आरोग्य केंद्रं, जिल्हा रुग्णालये आणि इतर सरकारी आरोग्य सुविधा केंद्रांमध्ये आयोजित केली जाणार आहे. या मोहिमेद्वारे देशभरात रक्तदान मोहीम देखील राबवली जाईल तसेच दात्यांची नोंद ई-रक्तकोष पोर्टलवर करण्यात येणार आहे. त्याशिवाय, माता आणि बाल आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या 'सुमन सखी चॅटबॉट'चा प्रारंभ पंतप्रधानांच्या हस्ते होईल. त्याशिवाय मध्य प्रदेशातल्या नागरिकांसाठी काही विशेष मोहिमांचा प्रारंभ देखील पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

**स्वच्छता ही सेवा**

स्वच्छता ही सेवा 2025 या अभियानाच्या 9 व्या आवृत्तीला आज देशभरात सुरुवात होत आहे. आज पासून 2 ऑक्टोबर पर्यंत हे अभियान सुरू राहणार आहे. देशभरातील लाखों लोकानां स्वच्छता मोहिमेसाठी एकत्रित करणं हा या अभियानाचा उद्देश आहे. गृहनिर्माण विभाग, शहरी व्यवहार मंत्रालय तसंच पेयजल आणि स्वच्छता विभागानं संयुक्तपणे सुरू केलेलया या अभियानामार्फत  नागरिक, समुदाय आणि संस्थांना एकत्र आणून स्वच्छता वाढवण्यावर लक्ष केंद्रित केलं जातं.

**पंतप्रधान-वाढदिवस कार्यक्रम**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंच्चाहत्तराव्या वाढदिवसानिमित्ताने संपूर्ण देशासह राज्यभरात विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्यातील सर्व विद्यापीठं आणि महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम होतील; त्याचबरोबर 'विकसित भारत संवाद' ही ऑनलाइन व्याख्यानमालाही होणार आहे. तसंच रक्तदान शिबिरं, स्वच्छता

अभियान, आरोग्य तपासणी शिबिरं, आरोग्यविषयक कार्यशाळा, पथनाट्य असे कार्यक्रमही होणार आहेत. युवा कार्य आणि क्रीडा मंत्रालयाच्या वतीनं, स्वच्छता ही सेवा अभियान राबविण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 75 व्या वाढदिवसानिमित्त केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज दिल्लीतील त्यागराज मैदानावर 15 प्रमुख योजनांचा शुभारंभ करणार आहेत. उत्तर प्रदेश सरकार सेवा पर्वा निमित्त 15 लाख वृक्ष लागवड, स्वच्छता पंधरवडा यासारखे कार्यक्रम राबवणार आहे.

**<u>यात्री सेवा दिवस</u>**

देशभरात आज विमानतळ प्राधिकारणांकडून यात्री सेवा दिवस साजरा केला जात आहे. प्रवाशांना चांगल्या सेवा पुरवणं हा या मागचा उद्देश आहे. दक्षिणेकडील राज्यांना भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी आज तामिळनाडू आणि पुददूचेरी विमानतळावर सकाळपासूनच विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. पारंपारिक पद्धतीनं प्रवाशांचं स्वागत केलं जाणार असून जेष्ठ नागरिकांसाठी वृक्षारोपण कार्यक्रम, तसंच मुलांसाठी चित्रकला, निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.

**<u>पंतप्रधान-वाढदिवस-शुभेच्छा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आज पंच्याहत्तरावा वाढदिवस. सर्वसामान्य कार्यकर्ता ते जगातील प्रभावशाली राजकीय नेत्यांपैकी एक होण्यापर्यंतचा नरेंद्र मोदी यांचा प्रवास विलक्षण आहे. पण राजकारणाच्या पलीकडे पंतप्रधान मोदी एक व्यक्ती म्हणून कसे आहेत? हे जाणून घेण्यासाठी ऐकुया काही नामवंत व्यक्तींनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी काढलेले गौरवोद्गार......

**लेखिका आणि समाजसेविका सुधामूर्ती म्हणाल्या की नरेंद्र मोदी हे मानवतेप्रती निष्ठा ठेवून पंच्याहत्तराव्या वर्षीही तरुणांच्या तडफेने कार्यरत आहेत....**

***ही वर्क्ड व्हेरी हार्ड टॉवर्ड्स नेशन एंड स्टिल वर्किंग टेक अ यंगस्टर ड्यु टु हिज सेव्हेंटी फाइव्ह. लोकहित करणीयम इस प्रोबेबली हिस मंत्रा एंड व्हिच हे हास फॉलोव्ड थ्रॉगउट हिस लाईफ.***

**ज्येष्ठ पत्रकार शेखर गुप्ता मोदीजींविषयी बोलताना म्हणाले....**

***इस पीढी में मोदीजी सेल्फ मेड नेताओं में से एक है तो वो एक युनिक फिनोमेनन है भारतीय पॉलिटिक्स के लिए ।***

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहृदय स्वभावातच त्यांच्या च्या प्रभावशाली राजकीय कारकिर्दीचं यश दडलेलं आहे असं सांगत सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले पंतप्रधानांविषयी म्हणाल्या...**

***वो सभ्य पुरुष मैंने इसलिए कहा के लोग गाली गलोच करते हैं, वो हम सुनते है ना, मैंने कभी उनके मूंसे किसी के लिए बुरा नही सुना मुझे ऐसा लगा की बहुत सभ्य और अच्छे दिल के इंसान है।***

**प्रसिद्ध भजन गायक अनूप जलोटा पंतप्रधानांविषयी बोलताना म्हणाले...**

***मोदीजी ने इस देश को जो सम्मान दिलाया हैं, जो शक्ति दी है वो अभी तक किसी भी प्रधानमंत्री द्वारा प्राप्त हुई।***

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयीचे हे गौरवोद्गार राजकारणाच्याही पलीकडे जाऊन भारताच्या भविष्यकालीन दूरदृष्टीविषयी खूप काही सांगून जातात अशी दूरदृष्टी ज्यामध्ये आशेचं तेज आहे, जी आधुनिकतेची कास धरून स्वप्नांना नवा आकार देते, अशी दूरदृष्टी जी सतत भारताचं गौरवशाली भविष्य घडवत आहे.**

**<u>शुभेच्छा</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. मोदी यांनी असाधारण नेतृत्व आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर महान ध्येय साध्य करण्याची संस्कृती देशात रुजवली आहे, असं त्यांनी आपल्या समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>ट्रंप-शुभेच्छा</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 75 व्या वाढदिवसानिमित्त दूरध्वनीवरुन शुभेच्छा दिल्या असल्याचं पंतप्रधानांनी आपल्या समाज मध्यमांवरील संदेशातून सांगितलं. ते म्हणाले की ट्रंप यांच्याप्रमाणेच भारत आणि अमेरिकेच्या व्यापक आणि जागतिक भागीदारीला नवीन उंचीवर नेण्यासाठी आपणही वचनबद्ध आहोत. युक्रेन संघर्षाच्या शांततापूर्ण निराकरणासाठी ट्रंप आणि घेतलेल्या पुढाकाराला भारताचाही पाठिंबा असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

**<u>ट्रम्प ब्रिटन भेट</u>**

ब्रिटनचे राजे किंग चार्ल्स यांच्या निमंत्रणावरून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प काल सपत्निक ब्रिटन भेटीवर आले आहेत. अमेरिकेच्या ब्रिटनमधील मुख्य राजदूत मोनिका क्रॉली यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. ही भेट अत्यंत महत्वाची असून  ती ब्रिटिश राज घराणं आणि अमेरिका यांच्यातील उच्चस्तरीय संबंध दर्शवते असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या सन्मानार्थ विंडसर कॅसलमध्ये, कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. या भेटी दरम्यान, दोन्ही देशांमधील संबंधांचं नूतनीकरण करण्यासाठी गुंतवणूक करारांवर स्वाक्षरी करण्यात येणार आहे.

**<u>मराठवाडा मुक्तीदिन</u>**

हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त मराठवाड्यात आज विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथं सिद्धार्थ उद्यानातल्या स्मृतिस्तंभ परिसरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. तर बीड इथं उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमध्येही आज ध्वजारोहण आणि अन्य कार्यक्रम होणार आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या फुलंब्री इथं मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज

अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभही आज होणार आहे. तसंच अमळनेर -बीड या नव्या रेल्वेमार्गाचं उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेगाडीचा प्रारंभही आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

**<u>चौहान</u>**

दिल्लीत राष्ट्रीय कृषी परिषद-रबी अभियान 2025 या दोन दिवसीय परिषदेचा प्रारंभ केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांच्या अध्यक्षतेखाली झाला. येत्या वर्षासाठी रबी हंगामासाठी साडेबासष्ट दशलक्ष टनांहून अधिकचे लक्ष्य ठेवण्यात आल्याची माहिती चौहान यांनी वार्ताहर परिषदेत दिली. 2024-25 या वर्षांत देशातील एकंदर अन्नधान्य उत्पादन साडेतीनशे दशलक्ष टनांपेक्षा अधिक झाल्याचं सांगून ते त्या आधीच्या वर्षापेक्षा साडेसहा टक्के अधिक असल्याचं ते म्हणाले. भात, गहू, मका, भुईमूग आणि सोयाबीन यांसारख्या प्रमुख पिकांमध्ये विक्रमी उत्पादन नोंदवण्यात आल्याचंही त्यांनी यावेळी सांगितले.

**<u>भालाफेक</u>**

जागतिक ॲथलेटिक्स स्पर्धेत तिसऱ्यांदा अजिंक्यपद मिळवण्याच्या अपेक्षेनं भालाफेकपटू नीरज चोप्रा आज मैदानात उतरणार आहे. दोन वर्षांपूर्वी बुडापेस्टमध्ये 88 पूर्णांक 17 मीटर भालाफेकीची नोंद करून नीरज चोप्रा ॲथलेटिक्समध्ये भारताचा पहिला जागतिक विजेता ठरला होता. आशियाई स्पर्धेतली सुवर्णपदक विजेती अन्नू रानी महिलांच्या भालाफेक स्पर्धेत भारताकडून खेळणार आहे.

**<u>महिला क्रिकेट</u>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया महिला क्रिकेट संघा दरम्यानच्या मर्यादित षटकांच्या 3 सामन्यांच्या मालिकेतला दूसरा सामना आज चंदीगड इथं होणार आहे. पहिला सामना जिंकून ऑस्ट्रेलियानं या मालिकेत आघाडी घेतली आहे. दरम्यान महिला विश्वचषक स्पर्धेला दोन आठवड्यांपेक्षाही कमी वेळ शिल्लक आहे, भारत आणि श्रीलंका दोन्ही देश संयुक्तपणे या स्पर्धेचं आयोजन करत आहेत. येत्या 30 सप्टेंबर ते 2 नोव्हेंबर या कालावधीत ही स्पर्धा होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार